ब) जिल्हा परिषदे कडील विभागासाठी मंजूर असलेल्या आकृतीबंधानुसार खालील पदे नव्याने मंजूर करण्यास शासन मंजुरी देत आहे.

| अ. क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | जिल्हा परिषदेच्या एका विभागासाठी मंजूर पदे | आकृतीबंधानुसार कमी पडणारी पदे | नव्याने मंजूर करावयाची एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|
| १. | वरिष्ठ सहाय्यक | ४०००-६००० | ५ | १ | १४ |
| २. | वरिष्ठ सहाय्यक(लेखा) | ४०००-६००० | १ | १ | १४ |
| ३. | संगणक | ३०५०-४५९० | १ | १ | १४ |
| ४. | आरेखक | ४५००-७००० | १ | १ | १४ |

क) जिल्हा परिषदे कडील विभागासाठी मंजूर असलेल्या आकृतीबंधानुसार म.जी.प्रा. कडील विभागातील पदांचे उन्नतीकरण करून खालील पदांचे पदनाम बदलण्यास शासन मंजुरी देत आहे.

| अक्र | म.जी.प्रा.कडील पदांचे सध्याचे पदनाम व वेतनश्रेणी | | | उन्नतीकरणा नंतरचे पदनाम व वेतनश्रेणी | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पदनाम | वेतनश्रेणी | एकूण पदे | पदनाम | वेतनश्रेणी | एकूण पदे |
| १. | विभागीय लेखापाल | ५०००-८००० | १४ | सहाय्यक लेखाधिकारी | ५५००-९००० | १४ |
| २. | प्रथम लिपिक | ५०००-८००० | १४ | कक्ष अधिकारी | ५५००-९००० | १४ |

ड) म.जी.प्रा. कडील विभागातील मंजूर पदांचे पदनाम जिल्हा परिषदेकडील विभागाच्या मंजूर पदांनुसार करण्यास शासन मंजुरी देत आहे.

| अक्र | सध्याचे पदनाम | | | बदलावयाचे पदनाम | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पदनाम | वेतनश्रेणी | एकूण पदे | पदनाम | वेतनश्रेणी | एकूण पदे |
| १. | वरिष्ठ लिपिक | ४०००-६००० | ५६ | वरिष्ठ सहाय्यक | ४०००-६००० | ५६ |
| २. | कनिष्ठ लिपिक | ३०५०-४५९० | ११२ | कनिष्ठ सहाय्यक | ३०५०-४५९० | ११२ |
| ३. | सहाय्यक भांडारपाल | ३०५०-४५९० | १४ | भांडारपाल | ३०५०-४५९० | १४ |

२. संदर्भीय अधिसुचनेन्वये **"स्वतंत्र गावच्या रु. ७५ लाख पर्यंतच्या"** ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे बांधकाम व संपूर्ण ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल व दुरुस्तीचे काम जिल्हा परिषदांकडे सोपविण्यात आले असल्याने, जिल्हा परिषदांकडे सोपविलेली कर्तव्ये आणि कार्ये पार पाडणे त्यांना शक्य व्हावे यासाठी सोबतच्या परिशिष्ट -२ मध्ये नमूद केलेल्या कर्मचारी आकृतिबंधानुसार प्रत्येकी ३३ पदे सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, नंदुरबार, सांगली, परभणी, हिंगोली, उस्मानाबाद,वाशिम ,वर्धा, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया व गडचिरोली या जिल्हा परिषदांच्या आस्थापनेवर निर्माण करण्यास व त्यासाठीची एकूण ४६२ पदे वरील १४ जिल्हा परिषदांच्या आस्थापनेवर निर्माण करण्यास शासन मंजूरी देत आहे.

३. महाराष्ट्र जीवन प्रधिकरणकडून जिल्हा परिषदांकडे हस्तांतरित होण-या या ४६२ पदांवरील वेतन व भत्यावरील मार्च २००१ पर्यंतचा खर्च महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात यावा.

४. सन २००१ -२००२ या आर्थिक वर्षापासून ४६२ पदांच्या वेतन व भत्यावरील खर्च खालील लेखाशिर्षातर्गत करण्यात येणा-या तरतूदी मधून भागविण्यात यावा.

१) राजपत्रित अधिका-यांचे वेतन व भत्ते यावरील खर्च २२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता, ०१ पाणी पुरवठा,००१ प्रशासन व संचालन, पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अमलबजावणी साठी विभागीय व उप विभागीय आस्थापना(२२१५ १८४३ ).

२) अराजपत्रित कर्मचा-यांचे वेतन व भत्ते यावरील खर्च २२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता, ०१ पाणी पुरवठा,१९१ स्थानिक संस्था, नगरपालिका इत्यादींना सहाय्य (पाच)महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम,१९६१ कलम १८३ अन्वये जिल्हा परिषदांना आस्थापना अनुदान (स्थानिक क्षेत्र ) नियमित आस्थापना (२२१५ १८८१).

५. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्यांचे अनौपचारिक संदर्भ क्रमांक ९३१/व्यय ३.दिनांक ४.११.२००० अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सुधीर ठाकरे)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
सर्व विभागीय आयुक्त,
सदस्य सचिव(प्रशासन)महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ,मुंबई
सदस्य सचिव(तांत्रिक)महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ,मुंबई
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,
महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
मुख्य लेखापरीक्षक स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
सर्व उपमुख्य लेखापरीक्षक स्थानिक निधी लेखा
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,

सर्व अधिक्षक अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
सर्व जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी,
सर्व कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ,
सर्व कार्यकारी अभियंता,ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद
संचालक,भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,पुणे.
सर्व प्रादेशिक उपसंचालक,भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक,भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
नियोजन विभाग,मंत्रालय,मुंबई
वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
ग्रामविकास विभाग,मंत्रालय,मुंबई
मंत्रालयातील सर्व विभाग
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती,पापु०७

## परिशिष्ट-१

शा.नि.पा.पु.व स्व वि. क्र.ग्रापापु १०००/प्र.क्र.१०७/पापु०७ दि. १०.२००० चे सहपत्र.

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | गट | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | कार्यकारी अभियंता (स्थापत्य) | १४ | अ | १०६५०-१५,८५० |
| २. | उपअभियंता (स्थापत्य) | १४ | ब | ८०००-१३,५०० |
| ३. | उपअभियंता (यांत्रिकी) | १४ | ब | ८०००-१३,५०० |
| ४. | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | ५६ | ब/क | ५५००-९००० |
| ५. | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) | १४ | ब/क | ५५००-९००० |
| ६. | विभागीय लेखापाल | १४ | क | ५०००-८००० |
| ७. | प्रथम लिपीक | १४ | क | ५०००-८००० |
| ८. | वरिष्ठ लिपीक | ५६ | क | ४०००-६००० |
| ९. | कनिष्ठ लिपीक | ११२ | क | ३०५०-४५९० |
| १०. | भांडरपाल | १४ | क | ४५००-७००० |
| ११. | सहाय्यक भांडरपाल | १४ | क | ३०५०-४५९० |
| १२. | मुख्य आरेखक | १४ | क | ४०००-६००० |
| १३. | आरेखक | १४ | क | ३२००-४९०० |
| १४. | वाहनचालक | १४ | क | ३०५०-४५९० |
| १५. | शिपाई | ५६ | ड | २५५०-३२०० |
| १६. | दप्तरी | १४ | ड | २५५०-३२०० |
| १७. | चौकीदार | १४ | ड | २५५०-३२०० |
| | एकूण | ४६२ | | |

**सुधारित ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम-**
**लोकसहभागाची संकल्पना व कार्यक्रम**
**राबविण्यासाठी मार्गदर्शक सूचना.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्र. ग्रापापु-१००१/ प्रक्र-१९०/पापु-०७,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ सप्टेंबर २००१**

**वाचा:-** १) शासन निर्णय, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.ग्रापापु-१०९९/प्रक्र-३२८/ पापु-०७, दिनांक २७ जुलै, २०००.
२) शासन निर्णय, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. ग्रापापु-१०००/प्रक्र-१६९/पापु-०७, दिनांक २२ डिसेंबर, २०००.

**प्रस्तावना -**

ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रम राबविण्यासाठी केंद्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शक सूचना, केंद्र शासनाच्या वर्धित वेग ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमासाठी व राज्याच्या किमान गरजा कार्यकमांतर्गत ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमासाठी लागू करण्याचा धोरणात्मक निर्णय उपरोक्त क्रं.१ येथील दिनांक २७ जुलै, २००० च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आला आहे. या निर्णयानुसार ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रम **मागणी आधारित पुरवठा आणि लोकसहभागाच्या तत्त्वावर आधारित** राबविण्यात येणार आहे. यानुसार योजनेची निवड, आखणी, अंमलबजावणी, देखभाल व दुरुस्ती ही संबंधित लाभार्थ्यांनी करावयाची आहे. हे सुधारित धोरण जाहीर झाल्यानंतर या लोकसहभागाच्या धोरणाचा अन्वयार्थ **"ग्रामीण जनतेकडून योजनेचा १०% खर्च वसूल करणे"** , मात्र निर्णयाधिकार व जबाबदारी पूर्वीप्रमाणेच शासन यंत्रणेकडेच राहील असा लावण्यात आला आहे.

२. भारतीय राज्य घटनेच्या ७३ व्या घटना दुरुस्तीनंतर राज्यघटनेच्या ११ व्या अनुसूचीनुसार पिण्याच्या पाण्याचा विषय हा संपूर्णपणे पंचायत राज संस्थांच्या अधिकार क्षेत्रात आल्यानंतर राज्य शासनाने अधिकाधिक अधिकार व जबाबदारी पंचायत राज संस्थांकडे देण्याच्या ज्या पुरोगामी धोरणाचा अवलंब केला आहे, त्या धोरणाचा एक महत्त्वाचा भाग म्हणून पिण्याच्या पाण्याचे सुधारित धोरण जाहीर केले आहे. एवढेच नव्हेतर त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्थेअंतर्गत जेथे जेथे शक्य होईल तेथेतेथे हे अधिकार जास्तीत जास्त प्रमाणात पंचायत राज संस्थांपैकी ग्राम स्तरावरील ग्रामीण जनतेचा सगळयात जवळचा स्तर असणा-या

ग्रामपंचायतीस किंवा ग्राम स्तरावरील इतर संस्थात्मक घटकांना देण्याचें आणि अशाप्रकारे लोकाधिकार आणि लोकनिर्णय याचे लोकशाही स्वरुप आणखी प्रगल्भ करण्याचे जे धोरण शासनाने अवलंबिले आहे त्या अनुषंगाने पिण्याचे पाणीपुरवठयाचे जास्तीत जास्त अधिकार ग्राम स्तरावर देण्याचा उद्देश या सुधारित धोरणामागे आहे. ग्राम स्तरावरसुध्दा निर्णय घेताना ते प्रतिनिधीक स्वरुपाचे न राहता त्याला आणखी व्यापक सार्वजनिक स्वरुप यावे म्हणून व्यावहारिकदृष्टया शक्य असेल तेथे निर्णयाधिकार ग्रामसभेला देऊन लोकाभिमुख लोकशाही (Direct Democracy) हे धोरण पाणीपुरवठयाच्या सुधारित धोरणात प्रतिबिंबित करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

३.. परंतु क्षेत्रिय कामकाजाचा आढावा घेतला असता असे दिसून येते की, हे लोकाभिमुख लोकसहभागाचे व्यापक धोरण म्हणजे केवळ **"१०% लोकवर्गणी"** शासनाकडे जमा करणे आणि संपूर्ण अधिकार शासकीय अथवा जिल्हापरिषदेच्या यंत्रणेकडेच केंद्रित राहणे अशा स्वरुपात जनमानसात बिंबवले गेले आहे. हा गैरसमज दूर करुन सुधारित पाणीपुरवठा धोरणातील लोक सहभागाचे तत्त्व स्पष्ट करण्याची व त्या अनुषंगाने या धोरणाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

**प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा सर्व साकल्याने विचार करुन शासन निर्णय, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.ग्रापापु-१०९९/प्रक्र-३२८/पापु-०७, दिनांक २७ जुलै, २००० अन्वये निर्गमित केलेल्या सुधारित पाणीपुरवठा धोरणाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीकरिता पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेतः-**

१) गावात / वाडीत पिण्याच्या पाण्याची योजना आवश्यक असल्यास तशी **मागणी** संबंधित गाव/ वाडी ज्या ग्रामपंचायत क्षेत्रात अंतर्भूत आहे, त्या **ग्रामपंचायतीकडून** प्राप्त होणे आवश्यक आहे. ही मागणी संबंधित ग्रामपंचायतीने **ग्रामसभेत ठराव घेवून करावी.**

2) परंतु प्रत्येक ग्रामसभा घेण्यापूर्वी ज्या वॉर्ड/ वाडी/ वस्ती ( स्वतंत्र असलेल्या ) मध्ये योजना घ्यावयाची आहे किंवा इतर परिस्थितीतसुध्दा, त्या लाभधारक मतदारांची वेगळी चर्चासभा घेवून त्यांचे विचार जाणून घ्यावेत. तसेच महिला मंडळांमार्फत अथवा ग्रामपंचायतीमार्फत गावातील लाभधारक महिला मतदारांची

वेगळी सभा घेवून योजनेची साधकबाधक चर्चा करण्यात यावी. अशा सभांमधून झालेल्या चर्चेची व मागण्यांची माहिती नंतर होणा-या ग्रामसभेत सादर करण्यात यावी, व त्यानंतर ग्रामसभेने ठराव करावा.

3) ग्रामसभेने केलेला हा ठराव ग्रामपंचयतीने **जिल्हा परिषदेकडे** पाठवावेत. या ठरावात शक्य असल्यास ग्रामसभेने पाणीपुरवठयाची कोणत्या प्रकारची योजना गावात/ वाडीत घेणे अभिप्रेत आहे. (उदा. साधी विहिर, विंधन विहिर, लघु नळ पाणीपुरवठा योजना, नळ पाणीपुरवठा योजना इ.) हे नमूद करणे पुढील कार्यवाहीच्या दृष्टीने योग्य होईल. लघु नळ पाणीपुरवठा योजना, नळ पाणीपुरवठा इ.) हे नमूद करणे पुढील कार्यवाहीच्या दृष्टीने योग्य होईल. ग्रामसभेत गावातील एकूण जलस्त्रोत, पाणी वाढविण्यासाठी करावयाची उपाययोजना, पाण्याचा सध्याचा वापर, पिण्यासाठी आवश्यक पाणी राखून ठेवण्यासाठी करावयाची उपाययोजना यावर चर्चा व्हावी. यासाठी ग्रामसभेत संबंधित तलाठी, कृषी विभागाचे अधिकारी, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे तांत्रिक अधिकारी व जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी यांनी हजर राहून माहिती द्यावी. ग्रामसभेची पूर्व सूचना देवूनही सदर अधिकारी अतिशय अपरिहार्य परिस्थितीत, हजर राहू शकत नसतील तर त्याची कारणे त्यांनी ग्रामसभेला सभेपूर्वी कळवून ग्रामसभेस आवश्यक असणारे मार्गदर्शन/ माहिती देण्याची पर्यायी व्यवस्था करावी. मात्र पूर्व सूचना देवूनही जर संबंधित तलाठी, कृषी अधिकारी, जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी व भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे तांत्रिक अधिकारी गैरहजर राहिल्यास अथवा पर्यायी व्यवस्था न केल्यास आणि ग्रामसभेने बहुमताने तसा ठराव करुन तो सक्षम अधिका-यांकडे सादर केल्यास, सक्षम अधिकारी त्या ठरावाची योग्य दखल घेवून संबंधित अधिका-यांविरुध्द कारवाई करतील व तसे संबंधित ग्रामसभेस कळवतील. तसेच त्यानंतर याच बाबीसाठी बोलावलेल्या सभेला योग्य अधिकारी हजर राहतील याची व्यवस्था करतील. गावातील उपलब्ध पाणी, पिण्यासाठी राखून ठेवावयाचे प्रमाणे, स्त्रोत व तांत्रिक बाबी याची प्राथमिक माहिती घेण्यासाठी ग्रामसभा इतर सेवाभावी संस्था अथवा खाजगी तज्ञ यांचेही सहकार्य घेऊ शकतील.

4) ग्रामसभेच्या ठरावानुसार ग्रामपंचायतीकडून अशी मागणी जेव्हा करण्यात येईल तेव्हा ग्रामपंचायतीने जर **निश्चित योजना** प्रस्तावित केली नसेल तर जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या संबंधित अभियंत्यानी त्या गावास/ वाडीस कोण कोणते पर्याय **तांत्रिक, व्यावहारिक व आर्थिदृष्टया** योग्य आहेत हे सुचवावेत. सदर पर्यायांबाबतची संपूर्ण माहिती संबंधित अभियंत्याने सर्वसामान्यांना समजेल अशा पध्दतीने संबंधित ग्रामसभेस द्यावी. त्यासाठी आवश्यक असल्यास पुन्हा ग्रामसभा **मुख्य कार्यकारी अधिकारी,** यांनी किंवा **गट विकास अधिकारी** यांनी निर्देश देऊन बोलवावी.

५) वरील १ ते ४ प्रमाणे जिल्हा परिषदेकडे सादर करताना ग्रामसभेने खालील बाबींवर ठराव करणे आवश्यक राहील.

अ) योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी **"ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती "** गठित करावी.

ब) ग्रामसभेने ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती निवडताना **यात किमान ५०% महिला व मागासवर्गीय प्रतिनिधी** अंतर्भूत असतील. ग्रामपंचायतीच्या हद्दीत येणा-या **प्रत्येक वाडी/ वस्तीला शक्य** ते योग्य प्रतिनिधित्व मिळेल अशा त-हेने निवडावी. ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीत ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य अंर्तभूत करण्यासाही प्रत्यवाय नाही. तसेच ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष, सरपंच असावेत अथवा इतर कोणी असावे याबाबताचा निर्णयसुध्दा ग्रामसभेनेच घ्यावयाचा आहे. **एकूण हा निर्णय पूर्णपणे ग्रामसभेच्या अखत्यारितील आहे.**

क) योजनेची **अंमलबजावणी** म्हणजेच **निविदेची कागदपत्रे तयार करणे, निविदा जाहिरात वर्तमानपत्रात देणे,** निविदा प्राप्त झाल्यानंतर **प्रत्यक्ष छाननी करु न अंतिम निर्णय घेणे, निवडलेल्या कंत्राटदाराला कार्यादेश देणे, कंत्राटदाराच्या कामावर लक्ष ठेवणे,** आवश्यकतेनुसार राज्यशासनाने ठरवून दिलेल्या विहित पध्दतीने अथवा दर करारानुसार योजनेसाठी लागणाऱ्या सामुग्रीची खरेदी करणे, योजनेच्या बांधकामाच्या टप्प्यानुसार जिल्हा परिषदेने नियुक्त केलेल्या अभियंत्यांच्या प्रतिस्वाक्षरीनुसार देयके अदा करणे ही कामे ग्रामसभेने निवडलेली ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती करेल. यापैकी ग्रामसभा ठरवेल त्यानुसार काही बाबींचे अधिकार या समितीला पूर्णपणे देण्याचे व काही महत्त्वाच्या बाबीसाठी समितीने प्राथमिक कार्यवाही करु न ग्रामसभेची अंतिम मंजुरी घेण्याबाबत ठरावात तपशिलावार अंतर्भूत असावे. (आदर्श नमुना ठराव सोबत जोडपत्र-१ मध्ये देण्यात आला आहे.)

ड) योजनेच्या अंमलबजावणीसाठी ग्रामपाणीपुरवठा व स्वच्छता समितीचे नावे **वेगळे बँक खाते** उघडून ते खाते चालविण्याचे अधिकार ग्रामसभेने ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीच्या किमान दोन पदाधिका-यांना द्यावेत. तसेच **लोकवर्गणीची** लोकांकडून वसूल करण्यांत आलेली रक्कम जशी जमा होईल तशी वरीलप्रमाणे उघडण्यात आलेल्या **बँक खात्यात** जमा करण्याचे अधिकार **ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीला** द्यावे लागतील व त्याला ग्रामपंचायतीच्या पंच कमिटीची ठरावाव्दारे सहमती असणे आवश्यक राहील. ग्रामपंचायतीच्या सर्व बाबींसाठी या समितीस ग्रामपंचायतीच्या उपसमितीचा दर्जा असेल. मात्र या उपसमितीच्या कामाकाजाचा आढावा केवळ ग्रामसभाच घेऊ शकेल.

५) बँकखाते उघडण्याचा निर्णय घेताना कोणत्याही निकटच्या राष्ट्रीयकृत बँकेत अथवा सहकारी बँकेत खाते उघडण्याचा निर्णय घेण्यास हरकत नाही.

६) योजना पूर्ण झाल्यावर त्याच्या देखभाल दुरु स्तीसाठी खर्चाची १००% रक्कम लाभार्थ्यांकडून वसूल करण्याचे व त्यासाठी योग्य प्रमाणात पाणीपट्टी वाढवून ती वसूल करण्याचे आणि ती न भरणाऱ्यांवर उचित कार्यवाही करण्याबाबतचे अधिकार ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीला, ग्रामसभेने द्यावेत.

७) अशा तऱ्हेने वर नमूद केलेले ठराव ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने व ज्या ठिकाणी सरपंच ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीत अंतर्भूत नसतील त्या ठिकाणी सरपंचाच्या प्रतिस्वाक्षरीने **जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना सादर करावे.** आवश्यकतेनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी असे ठराव ग्रामसभा घेवून करण्यांत आले आहेत किंवा नाही याची तपासणी स्वतः किंवा पंचायत समितीच्या गट विकास अधिकाऱ्यांकडून किंवा इतर माध्यमातून करु शकतील. परंतु प्रत्येक वेळी अशी तपासणी केलीच पाहिजे असे बंधन नाही. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना परिस्थितीनुरुप निर्णय घेण्याचे स्वेच्छाधिकार असतील.

८) जिल्हापरिषदेने त्यांच्याकडे ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समितीकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांचे नोंदणी रजिस्टर ठेवावे. ते सर्व ग्रामपंचायतीस व जनतेस तपासणीसाठी खुले असावे. उपलब्ध निधीच्या अनुषंगाने आलेल्या प्रकरणावर शासनाने ठरवून दिलेल्या निकषानुसार व प्राधान्यक्रम विचारात घेवून तसेच निधीच्या उपलब्धतेनुसार निर्णय घ्यावा. हा प्राधान्यक्रम व निकष कोणत्याही परिस्थितीत शिथिल करता येणार नाही. अतिशय आणीबाणीच्या परिस्थितीत तो बदलणे अपरिहार्य वाटत असल्यास जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेचा तसा ठराव निर्णयार्थ शासनाकडे पाठवावा.

९) जिल्हा परिषदेने, जिल्हापरिषदांतर्गत विविध प्राधिकाऱ्यांना दिलेल्या अधिकारानुसार स्वतंत्र गावाच्या **रुपये ७५ लाखा** पर्यंतच्या ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समितीकडून प्राप्त झालेल्या योजनेच्या प्रस्तावाची तपासणी करावी. त्या योजनेस तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकारी जिल्हा परिषदेतील संबंधित अधिकाऱ्यांना ज्या रकमेपर्यंत असतील त्यानुसार त्यांनी मान्यता द्यावी.

१०) **किमान गरजा कार्यक्रमाअंतर्गत स्वतंत्र गावाच्या रुपये ७५ लाखा पर्यंतच्या योजनांना प्रशासकीय मंजुरी देण्याचे अधिकार** जिल्हापरिषदेतील प्राधिकाऱ्यांना आहेत. **तांत्रिक मान्यतेचे रुपये २५ लाखा** पर्यंतचे अधिकार जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना आहेत.

त्यापेक्षा जादा रकमेचे प्रस्ताव अधिकारानुरुप महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे संबंधित **अधीक्षक अभियंता, मुख्य अभियंता,** अथवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या **मुख्यालयाकडे पाठवावे.** तसेच प्रशासकीय मान्यतेसाठी ७५ लाखापेक्षा मोठया योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अथवा शासनाकडे अधिकारानुसार पाठवाव्यात.

११) केंद्र शासनाच्या **वर्धित वेग कार्यक्रमांतर्गत** मंजूर करावयाच्या ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने पाठविलेल्या सर्व योजना **शासनाकडे मंजुरीस्तव सादर कराव्यात.**

१२) प्रशासकीय मान्यतेसाठी व तांत्रिक मान्यतेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावावर संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांनी असे प्रस्ताव प्राप्त झाल्याचे तारखेपासून **कमाल ६० दिवसात** निर्णय घ्यावा. जर असा निर्णय ६० दिवसांत घेण्यात आला नाही अथवा निर्णय घेण्यास होत असलेल्या विलंबाची कारणे संबंधित गावास या कालावधित कळविली नाहीत तर, योजनेस तांत्रिक अथवा प्रशासकीय मान्यता मिळाली आहे असे गृहीत धरुन संबंधित गावाची ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती पुढील कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पूर्व मान्यतेने सुरु करु शकेल. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडूनच दिरंगाई झाली असल्यास जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांचे मान्यतेने पुढील कार्यवाही करण्यात येईल. विहित मुदतीत निर्णय घेण्यास असमर्थ ठरलेल्या अधिकारी / पदाधिकाऱ्यांना अशा अनिर्णित ठेवलेल्या बाबीसाठी जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द कार्यवाही करण्यात यावी.

१३) एखाद्या गावाला राज्य शासनाने **दिनांक २७ जुलै,२०००** च्या शासन निर्णयान्वये ठरवून दिलेल्या निकषापेक्षा अधिक म्हणजे दरडोई दरमाणसी ४० लिटर पेक्षा जास्त पाणीपुरवठा आवश्यक असेल किंवा सार्वजनिक नळ कोंडाळयाऐवजी वैयक्तिक घरगुती नळ जोडणी हवी असेल किंवा सामूहिक नळ जोडण्या हव्या असतील तर शासनाच्या निकषाहिपेक्षा जादा सुविधासांठी जो जादा खर्च येणार आहे **तो संपूर्णपणे** संबंधित लाभार्थ्यांनी, लाभार्थीसमूहाने अथवा गावाने उचण्याचा ठराव केल्यास व त्याप्रमाणे रक्कम ग्रामस्तरावर उघडलेल्या बँकखात्यावर जमा केल्यास व तेवढे जादा पाणी उपलब्ध असल्याचा लेखी सल्ला जिल्हा परिषदेतील अथवा शासनाच्या भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेतील तांत्रिक अधिकाऱ्यांने दिल्यास अशा जादा सुविधांची नळ योजनासुध्दा मंजूर करण्यास हरकत नाही.

१४) महाराष्ट्र भूजल विधेयकातील तरतुदींचे गावाकडून पालन केले जाईल असा ठराव ग्रामसभेत करुन व त्यानुसार गावातील पाणी वाटप कसे नियोजित होणार आहे त्याची माहिती योजनेच्या मागणी पत्रासोबत जिल्हा परिषदेकडे सादर करणे आवश्यक आहे.

१५) योजना मंजूर झाल्याचे पत्र ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीला प्राप्त झाल्यानंतर, ठरलेल्या टप्प्यानुसार लोकवर्गणीची आवश्यक रक्कम बँकखात्यात जमा करावी व नंतर जिल्हा परिषदेला कळवावे. मंजूर आराखडे व प्राकलनात नमूद टप्प्यानुसार जिल्हा परिषदेतर्फे वेळावेळी आवश्यक रक्कम त्या बँकखात्यात जमा करण्यांत यावी.

१६) योजना मंजूर झाल्यावर व कंत्राटदाराची नियुक्ती केल्यानंतर ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती , जिल्हा परिषद व कंत्राटदार यांच्यात योजनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीबाबत त्रिपक्षीय करार करण्यात यावा. या करारात संयुक्त साक्षीदार म्हणून ग्रामपंचायतीच्या पंच कमिटिने प्राधिकृत केलेला प्रतिनिधी (ज्यांचा समावेश ग्राम पाणीपुरवठा समितीत नसेल असा), गावातील महिला मंडळाचे प्रतिनिधी यांच्या सहया घेण्यात याव्यात.

१७) मंजूर आराखडे व प्राकलनांनुसार **निविदा कागदपत्रे तयार करणे, निविदा जाहिरात वर्तमानपत्रात देणे, आलेल्या टेंडरची छाननी करणे** ही कामे **ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने** करावयाची आहेत. यासाठी आवश्यक तांत्रिक सहकार्य जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागाच्या / उप विभागाच्या तांत्रिक अधिकाऱ्यांनी ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीला उपलब्ध करुन द्यावयाचे आहे.

१८) ग्रामसभेने ठराव केल्यास, योजनेच्या प्रत्यक्ष तांत्रिक देखभालीसाठी जिल्हा परिषद किंवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे तांत्रिक अधिकाऱ्यांना यासाठी त्यांना नियुक्त करता येतील. मात्र जिल्हा परिषदेंच्या वतीने योजनेच्या कामाची तांत्रिक तपासणी, देखभाल व प्रतिस्वाक्षरी यासाठी जे अभियंते नेमले असतील त्याच अभियंत्यांना गावाच्या वतीने तांत्रिक देखरेखीसाठी नियुक्त करण्यात येवू नये. अशा तांत्रिक देखरेखीचा खर्च योजनेच्या खर्चात समाविष्ट करावा व तो महाराष्ट्र जीवन प्राधिकरण / जिल्हा परिषद यांना गावातर्फे अदा करण्यात यावा. यासाठी ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती व जिल्हा परिषद/ महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्यात स्वतंत्र करार करण्यात येईल. कालांतराने यासाठी शासन तांत्रिक देखरेख करु शकणा-या सेवाभावी संस्था/ तज्ञ यांचे पॅनेल तयार करेल त्यातून तांत्रिक देखरेख करता येईल. परंतू तोपर्यंत वरील पध्दत लागू राहिल.

१९) जिल्हा परिषदेने, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने व राज्य शासनाच्या संबंधित खात्याने ज्या कंत्राटदाराची यादी विहित पध्दतीने तयार केली असेल त्या यादीतीलच कंत्राटदाराना ग्राम पाणीपुरवठा स्वच्छता समितीने काढलेल्या निविदामध्ये भाग घेता येईल. मात्र ग्रामसभेने ठराव करुन हे काम ग्रामपंचायतीअंतर्गत करण्याचे ठरवले तर त्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची पूर्व परवानगी घ्यावी लागेल.

२०) ग्रामसभेने ठरविलेल्या योजनांसाठी राज्यशासन जिल्हा परिषदेमार्फत ९०% रक्कम उपलब्ध करुन देणार असल्याने ग्रामसभेन मान्य केलेल्या योजना तांत्रिकदृष्टया तपासून व अंमलबजावणीच्या काळात त्या योग्य प्रकारे पूर्ण होत आहे या बाबी तपासण्याचे अधिकार जिल्हा परिषदेच्या तांत्रिक अधिका-यांना, मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा परिषदेने ठरावाव्दारे ठरविलेल्या इतर अधिकाऱ्यांना असतील.

२१) कंत्राटदाराची बिले कामाच्या टप्प्यानुसार अदा करण्याचे अधिकार ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीला असतील. मात्र बिले अदा करण्यापूर्वी जिल्हा परिषदेच्या तांत्रिक अधिकाऱ्यांकडून ती तपासून घेवून त्यांची प्रति स्वाक्षरी घेतल्यानंतर ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती रक्कम धनादेशाव्दारे अदा करेल. बँकेला त्यानुसार जिल्हा परिषदेकडून आगावून सूचना देण्यात याव्यात.

२२) योजनेच्या बांधकामासाठी काही साधनसामुग्री बाहेरुन विकत घेवून कंत्राटदाराला पुरविण्याची आवश्यकता असल्यास त्यासाठी विहित कार्यपध्दतीचा अवलंब ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती करेल. अशा तऱ्हेने साधसामुग्री ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने खरेदी करावी किंवा ती कंत्राटदारानीच खरेदी करुन घ्यावी या बाबतचा धोरणात्मक निर्णय ग्रामसभा ज्या वेळी टेंडरला अंतिम मान्यता देईल त्याच वेळी घेईल. मात्र त्यानंतर पुढील कार्यवाही ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने, ग्रामसभेने दिलेल्या अधिकारानुसार करावी.

२३) साधनसामुग्री खरेदी करताना राज्य शासनाने, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने अथवा जिल्हा परिषदेने याबाबत केलेले दर करार असल्यास त्यानुसार व त्याच प्रतीची खरेदी करावी. दर करारापेक्षाही कमी रकमेत व उच्च प्रतीचा माल उपलब्ध होवू शकतो अशी ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीची खात्री झाल्यास निविदा सूचना अथवा दरपत्रके मागवून जिल्हा परिषदेच्या संबंधित तांत्रिक तज्ञाच्या पूर्व सहमतीनुसार व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या पूर्व परवानगीने निर्णय घेण्यात यावा.

२४) कार्यादेश देण्याच्या करारपत्रावर **ग्रामसभेने** मान्य केलेल्या **ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीचे पदाधिकारी** यांच्या सहया असतील व जिल्हा परिषदेने विहित केंलेल्या तांत्रिक अधिकाऱ्याची प्रति स्वाक्षरी (Counter Signature ) त्यावर राहील.

२५) योजनेचे काम सुरु असताना टप्प्यानुसार वेळोवेळी ग्राम पाणीपुरवठा स्वच्छता समितीने आवश्यकतेनुसार ग्राम सभा बोलावून कामाचा आढावा सादर करावा. गावातील किमान २५% मतदारांनासुध्दा आढावा घेणे अनिवार्य वाटल्यास ग्रामपंचायतीकडे अथवा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे विशेष ग्रामसभेची मागणी करता येईल. जिल्हा परिषद कायद्यानुसार ज्या ज्या प्राधिकाऱ्यांना ग्रामसभा

बोलाविण्याचे अधिकार आहे ते आवश्यकतेनुरुप पाणीपुरवठा योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने ग्रामसभा बोलावू शकतील.

२६) योजनेच्या अंमलबजावणीच्या काळात पर्यवेक्षनासाठी ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती एक कायम उप गट नेमेल. तसेच गावातील **महिला मंडळे** सुध्दा कामावर देखरेख करु शकतील. ग्रामपंचायतीस आवश्यक वाटल्यास एखाद्या सेवाभावी संस्थेला (ज्यांच्याकडे तांत्रिक सेवा उपलब्ध आहे ) अथवा तज्ञानासुध्दा त्यांच्या देखरेखीसाठी नेमू शकेल. मात्र याबाबत अंतिम जबाबदारी ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीचीच राहील.

२७) जिल्हा परिषदेच्या व राज्य शासनाच्या तांत्रिक अधिकाऱ्यांना योजनेच्या कामाजाची व खरेदी केलेल्या मालाची प्रत तपासणी करण्याचे पूर्ण अधिकार असतील. त्या अनुषंगाने आवश्यकतेनुसार ग्रामपंचायतीला अथवा ग्रामसभेला निदेश देण्याचेही जिल्हा परिषदेला व राज्य शासनाला अधिकार असतील.

२८) पाणीपुरवठा योजनेच्या कामाच्या **पूर्णत्वाचा दाखला** गावातील महिला मंडळांच्या सहमतीनंतरच देण्यात येईल व कंत्राटदाराची अंतिम देयके **ग्रामसभेने मान्यता दिल्यानंतर** आणि **जिल्हा परिषदेच्या संबंधित तांत्रिक अधिकाऱ्यांनी प्रति स्वाक्षरी** केल्यानंतरच अदा करण्यांत यावीत.

२९) योजनेच्या देखभाल दुरुस्तीकरिता नेमावयाचा कर्मचारी, त्याचा पगार, त्यांच्या अटी व शर्ती ठरविण्याचे अधिकार **ग्रामसभेला असतील.**

३०) पाणीपट्टी न भरणाऱ्यांवर कारवाई करण्याचे अधिकार ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीला असतील.

३१) ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीचे प्रतिनिधी व महिला मंडळाचे प्रतिनिधी यांना शासन ठरविल त्यानुसार कंत्राट निश्चित होण्यापूर्वी पाणीपुरवठा योजनांचे तांत्रिक/ प्रशासकीय व लेखाविषयक बाबीचे जुजबी ज्ञान प्राप्त होण्यासाठी व त्यांचे काम ते प्रभावीपणे करुन शकण्यासाठी दोन ते तीन दिवसांचे प्रशिक्षण पूर्ण करावे लागेल. जिल्हा परिषद, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण किंवा शासन ठरवेल त्या सेवाभावी व इतर संस्थामार्फत प्रशिक्षण देण्यात येईल त्या प्रशिक्षणास हजर राहणे अनिवार्य असेल त्याशिवाय त्यांना प्रतिनिधी म्हणून काम करता येणार नाही.

३२) योजनेच्या खर्चाचे ग्रामस्तरावर हिशेब ठेवण्यासाठी नियमावली तयार करण्यात येईल त्यानुसार हिशेब ठेवावे लागतील त्याचे लेखा परीक्षण करण्याचे शासनास व जिल्हा परिषदेस अधिकार असतील.

ग्रामसभेत हे हिशोब वेळोवेळी सादर केले जातील, हिशेब तपासण्याची शासनाच्या अधिकाऱ्यांना व जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांना मुभा असेल.

३३) वरील मार्गदर्शक सूचनाबाबत कोणतीही अडचण निर्माण झाल्यास त्या अडचणीचे निराकारण करण्याचे अधिकार शासनास असतील.

२. हे आदेश मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम ८(३) व १५३ अ नुसार राज्य शासनास असलेल्या अधिकारानुसार व ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत. तसेच उक्त नियमानुसार उपरोक्त जबाबदाऱ्या ग्रामसभेवर, ग्रामपंचायतीवर व तिच्या पंच कमिटीवर सोपविण्याचे निर्देश शासन देत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(रत्नाकर गायकवाड)**
**सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**
मा. राज्यपाल यांचे सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. उप मुख्य मंत्री यांचे सचिव,
मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा . अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व)
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन , मंत्रालय मुंबई
विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव (प्रशासन), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
सदस्य सचिव (तांत्रिक), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
जिल्हा पाणीपुरवठा अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सर्व
सर्व तहसीलदार
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व )
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व )
उपअभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा उप विभाग, जिल्हा परिषद सर्व
गटविकास अधिकारी पंचायत समिती सर्व
महालेखापाल. महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा परिक्षा)

महालेखापाल, महाराष्ट्र २ मुंबई (लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर (लेखा परिक्षा)
महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर (लेखा परिक्षा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परिक्षक. स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
मुख्य लेखा परिक्षक. स्थानिक निधी लेखा, नाशिक , पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
नियोजन विभाग, मंत्रालय मुंबई
वित्त विभाग. मंत्रालय. मुंबई
ग्रामविकास व जलसंधारण विभाग
मंत्रालयातील सर्व विभाग
पाणीपुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, पापु-०७.

४२५

## जोडपत्र-१

**(गावात/ वाडीत पिण्याच्या पाण्याची योजना आवश्यक असल्यास तशी मागणी करण्यासाठी ग्रामसभेने मंजूर करावयाच्या ठरावाचा आदर्श नमुना)**

. . . . . . . . . . . ग्रामसभेची सर्वसाधारण सभा श्री.. . . . . . . . . . , सरपंच / उप सरपंच ग्रामपंचायत . . . . . . . . . . . . यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक . . . . . . . . .रोजी . . . . . . . . वाजता. . . . . . . . . ठिकाणी खालील विषयावर विचार करण्यासाठी घेण्यात आली. सदर सभेस उपस्थित असलेल्या पदाधिकाऱ्यांची, अधिकाऱ्यांची व ग्रामस्थांची यादी सोबत जोडली आहे.

**विषय क्र.१ : गावासाठी/ वाडीसाठी पिण्याच्या पाण्याची योजना घेण्याबाबत.**

**ठराव क्रमांकः . . . . . .**

१) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. ग्रापापु १०९९/ प्र. क्र. ३२८/ पापु-०७, दिनांक २७ जुलै, २००० मध्ये देण्यात आलेल्या दरडोई पाणीपुरवठ्याच्या प्रमाणापेक्षा कमी पाणीपुरवठा गावास/ वाडीस होत असल्याने गावात/ वाडीत पिण्याच्या पाण्याची टंचाई भासत आहे. त्यामुळे गावातील ज्या वॉर्ड / वाडी/ वस्तीमध्ये योजना घ्यावयाची आहे त्या लाभधारक मतदारांची वेगळी चर्चासभा घेवून त्यांचे विचार जाणून घेण्यात आले. तसेच महिला मंडळांचे अथवा ग्रामपंचायतीमार्फत गावातील लाभधारक महिला मतदारांची वेगळी सभा घेवून योजनेची साधकबाधक चर्चा करण्यात आली. याबाबतची माहिती ग्रामसभेस करुन देण्यात आली. गावातील/ वाडीतील पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी गावास / वाडीस कोणकोणते पर्याय **तांत्रिक, व्यावहारिक व आर्थिकदृष्ट्या** योग्य आहेत याबाबतची संपूर्ण माहिती जिल्हा परिषदेतील तांत्रिक अधिकाऱ्यांनी ग्रामसभेस करुन दिली. त्यावर ग्रामसभेत चर्चा होऊन. . . . . . . गावात/ वाडीत. . . . . . . . . (येथे साधी विहिर, विंधन विहिर, लघु नळ पाणी पुरवठा योजना, नळ पाणीपुरवठा योजना इ. पैकी कोणती योजना गावात/ वाडीत घेणे आवश्यक ते नमूद करावे.) योजना घेण्यास . . . . . . . . .गावची ग्रामसभा तयार आहे.

२) वरीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात आलेल्या . . . . . . . . . . . योजनेसाठी अंदाजे रु. . . . . . . . . . एवढा ढोबळ खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च मान्य करण्यास . . . . . . . . . . . . . . . . ग्रामसभा तयार आहे. तसेच सदर योजनेच्या प्रत्यक्ष भांडवली खर्चाच्या १०% रक्कम लोकवर्गणीव्दारे भरण्यास व योजनेच्या देखभाल दुरुस्ती व व्यवस्थापनावरील १००% खर्च सोसावयास . . . . . . . . . ग्रामसभा तयार आहे.

३) योजना स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने आवश्यक ती पाणीपट्टी बसविण्यास व आवश्यकता असल्यास पाणीपट्टीच्या दरात वाढ करण्यास . . . . . . . . . . . ग्रामसभा तयार आहे.

४) प्रस्तावित योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी . . . . . . .. ग्रामसभेअंतर्गत खालीलप्रमाणे (येथे ग्राम सभेने निवडलेल्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या पदाधिकाऱ्यांची व सदस्यांची नांवे देण्यात यावीत.) ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती गठित करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

५) योजनेची **अंमलबजावणी** म्हणजेच **निविदेची कागदपत्रे तयार करणे, निविदा जाहिरात वर्तमानपत्रात देणे,** निविदा प्राप्त झाल्यानंतर **प्रत्यक्ष छाननी करुन अंतिम निर्णय घेणे, निवडलेल्या कंत्राटदाराला कार्यादेश देणे, कंत्राटदाराच्या कामावर लक्ष ठेवणे,** आवश्यकतेनुसार **राज्यशासनाने ठरवून दिलेल्या विहित पध्दतीने** अथवा **दर करारानुसार** योजनेसाठी लागणाऱ्या **सामुग्रीची खरेदी करणे, योजनेच्या बांधकामाच्या टप्प्यानुसार जिल्हा परिषदेने नियुक्त केलेल्या अभियंत्यांच्या प्रतिस्वाक्षरीनुसार देयके अदा करणे** ही कामे करण्यासाठी **ग्रामपाणी पुरवठा व स्वच्छता समितीस पूर्ण अधिकार देण्यात येत आहेत.**

**अथवा**

५) योजनेची **अंमलबजावणी** म्हणजेच **निविदेची कागदपत्रे तयार करणे, प्राप्त निविदांची छाननी करणे, कंत्राटदाराच्या कामावर लक्ष ठेवणे, साहित्य सामुग्रीच्या खरेदीची पूर्व तयारी करणे, कंत्राटदारांची देयके अदा करण्याची पूर्व तयारी करणे इत्यादी प्राथमिक स्वरुपाची** कामे करण्यासाठी **ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीस पूर्ण अधिकार देण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे निविदा जाहिरात वर्तमानपत्रात देणे,** प्राप्त निविदांची **छाननी केल्यानंतर त्यावर अंतिम निर्णय घेणे, निवडलेल्या कंत्राटदाराला कार्यादेश देणे,** आवश्यकतेनुसार **राज्य शासनाने ठरवून दिलेल्या विहित पध्दतीने** अथवा **दर करारानुसार** योजनेसाठी लागणाऱ्या **सामुग्रीची खरेदी करणे, योजनेच्या बांधकामाच्या टप्प्यानुसार जिल्हा परिषदेने नियुक्त केलेल्या अभियंत्यांच्या प्रतिस्वाक्षरीनुसार देयके अदा करणे** (ही अथवा यापैकी काही कामे हे ग्रामसभेने ठरवून तसे नमुद करावे) इत्यादी महत्त्वाच्या बाबीसाठी ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने प्राथमिक कार्यवाही करुन ग्रामसभेची **अंतिम मंजुरी घेण्याचे अधिकार ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीस देण्यात येत आहेत.**

६) कार्यादेश देण्याच्या करारपत्रावर सहया करण्यासाठी श्री. . . . . . . . . . . . . . . व श्री.. .. . . . . . . . . . . या **ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीच्या पदाधिकाऱ्यांना अधिकार देण्यात येत आहेत.**

**७)** योजनेच्या अंमलबजावणीसाठी . . . . . . . . . . . . . . . . . . बँकेत ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीचे नावे स्वतंत्र **खाते** उघडून ते खाते चालविण्याचे अधिकार श्री. . . . . . . . . . . . . . व श्री. . . . . . . . . . . . या ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीच्या पदाधिकाऱ्यांना देण्यात येत आहे. हे बँक खाते सदर दोन पदाधिकाऱ्यांच्या संयुक्त सहिने चालविण्यास व कंत्राटदाराचे धनादेश अदा करताना, संबंधित देयके जिल्हा परिषदेच्या तांत्रिक अधिकाऱ्यांकडून ती तपासून घेवून त्यांची प्रतिस्वाक्षरी घेतल्यानंतर धनादेशाव्दारे रक्कम अदा करण्यास ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीला अधिकार देण्यात येत आहेत.

८) **लोकवर्गणीची** लोकांकडून वसूल करण्यांत आलेली रक्कम जशी जमा होईल तशी ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीच्या नावे उघडयात येणाऱ्या **बँक खात्यात** जमा करण्याची जबाबदारी व अधिकार **ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीला** देण्यात येत आहेत.

**९) वरील (७) व (८) येथील बाबीसाठी** ग्रामपंचायतीच्या पंच कमिटीची ठरावाव्दारे स्वतंत्र सहमती घेण्यात यावी.

१०) पाणीपट्टी न भरणाऱ्यांवर कारवाई करण्याचे अधिकार ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीला देण्यात येत आहेत.

११) गावासाठी/ वाडीसाठी राज्य शासनाने **दिनांक २७ जुलै, २०००** च्या शासन निर्णयान्वये ठरवून दिलेल्या निकषा पेक्षा अधिक म्हणजे दरडोई दरमाणसी ४० लिटर पेक्षा जास्त पाण्याचा पुरवठा आवश्यक असून सार्वजनिक नळ कोंडाळया ऐवजी वैयक्तिक घरगुती नळ जोडणी हवी आहे. जादा पाणी उपलब्ध असल्याचा लेखी सल्ला जिल्हा परिषदेतील/ शासनाच्या भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेतील तांत्रिक अधिकाऱ्यांने दिला आहे. त्यामुळे शासनाच्या निकषा पेक्षा या जादा सुविधांसाठी जो जादा खर्च येणार आहे **तो संपूर्णपणे** भरण्यास . . . . . . . . . . . . . . . ग्रामसभा तयार आहे.

१२) महाराष्ट्र भूजल विधेयकातील तरतुदींचे गावाकडून पालन केले जाईल.

**सूचक** **- श्री.**
**अनुमोदक** **-श्री.**

**ठराव क्रमांक** ------------सर्वानुमते संमत करण्यात आला.

**ग्राम विकास अधिकारी / ग्रामसेवक** **सरपंच, ग्रामपंचायत.**

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी देण्यात येणारी अनुदाने टप्प्याटप्प्याने कमी करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
शासन निर्णय क्र.ग्रापापु-१००३/प्र.क्र. ४/पापु-०७
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,** दिनांक : ७ फेब्रुवारी , २००३

**वाचा -**
१) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग क्र.व्हीपीएम-२०८५/सी.आर.१९४०/२२, दिनांक ९.८.१९८५
२) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु-१००५/सी.आर.११८०/ पापु-०७., दिनांक ४.९.१९९६
३) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु-१०९६/प्र.क्र. ११५७/ पापु-०७ , दिनांक ५.९.१९९६
४) शासन निर्णय,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु-१०९९/प्र.क्र.३२८/ पापु-०७ , दिनांक २७.७.२०००

**प्रस्तावना**

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना पुरेसा निधी उपलब्ध व्हावा म्हणून संदर्भीय क्रमांक १ व २ येथील शासन निर्णयान्वये स्वतंत्र व प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांची विज देयके भागविण्यासाठी प्रति हॉर्स पॉवर दराने आकारलेल्या वीज बिलाच्या एकुण खर्चाच्या ५० % रक्कम अनुदान म्हणून जिल्हा परिषदांना देण्यात येत आहे. तर संदर्भीय क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये पिण्याच्या पाण्याच्या शुध्दीकरणासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत वापरण्यात येणा-या टी.सी.एल. पावडरच्या खरेदीवर येणा-या खर्चाच्या ५० % एवढे अनुदान जिल्हा परिषदांना देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे,संदर्भीय क्र. ४ येथील शासन निर्णयान्वये केंद्र शासनाच्या वर्धित वेग ग्रामीण पाणी पुरवठा योजनेतंर्गत राज्यास मिळणा-या तरतूदीपैकी १५% तरतूद व राज्य शासनाच्या किमान गरजा कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी करण्यात आलेल्या तरतूदीपैकी १५% तरतूद जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीत जमा करण्यासाठी राखून ठेवून ती जिल्हा परिषदांना देण्यात येत आहे.

२. ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी केंद्र शासनाने एप्रिल १९९९ मध्ये निर्गमित केलेल्या सुधारित मार्गदर्शक सूचना संपूर्ण राज्यासाठी लागू करण्याचा निर्णय संदर्भीय क्र.४ येथील दि. २७ जुलै २००० च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे. त्यानुसार राज्याचा किमान गरजा कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम व केंद्र शासनाच्या वर्धित वेग कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम या सुधारित मार्गदर्शक सुचनानुसार राबविण्यात येत आहे. या सुधारित मार्गदर्शक सूचनानुसार ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्ती यावरील १०० % खर्च संबंधित लाभार्थ्यांनी सोसायचा आहे. त्यामुळे या सुधारित मार्गदर्शक सूचनांनुसार हाती घेण्यात येणा-या योजनांचे व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्ती संबंधित लाभार्थ्यांनी करणे आवश्यक आहे.

३. परंतु, जुन्या योजनांसाठी देखभाल व दुरुस्तीसाठी वरील परिच्छेद १ मध्ये नमूद केल्यानुसार शासन जी अनुदाने देत आहे ती कायम राहीली तर, ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे देखभाल व दुरुस्तीसाठी दोन प्रकारच्या पध्दती राज्यात राहतील. त्यामुळे ही अनुदाने एकदम नव्हे तर टप्प्याटप्प्याने कमी करुन ती नविन धोरणाच्या पातळीवर आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करुन, शासन पुढीलप्रमाणे आदेश देत आहे:-

(१) ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे व्यवस्थापन , देखभाल व दुरुस्तीसाठी शासनाकडून संदर्भीय क्र. १ ते ४ येथील शासन निर्णयान्वये देण्यात येणा-या अनुदानात सन २००३-२००४ या आर्थिक वर्षापासून दरवर्षी २०% एवढी कपात करुन ही अनुदाने पुढील ५ वर्षात पूर्णपणे बंद करण्यात यावीत.

(२) ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्तीसाठी शासनाकडून देण्यात येणारी ही अनुदाने कमी केल्यामुळे योजनेच्या देखभाल व दुरुस्तीसाठी पुरेसा निधी उपलब्ध व्हावा म्हणून सर्व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी ते सध्या आकारत असलेल्या पाणी पट्टीच्या दरांमध्ये दरवर्षी लगतपूर्वीच्या वर्षातील अनुदान कपातीमुळे स्वनिधीतून भरावा लागणा-या जादा खर्चासंबंधी तो खर्च भागविता येईल एवढी अथवा २० % यापैकी जे जास्त असेल तेवढी वाढ करावी.

\Wss2...  ...-3.doc

(३) ज्या योजनेचे लाभार्थी वरीलप्रमाणे पाणी पट्टीच्या दरामध्ये दरवर्षी वाढ करतील अशा योजनांच प्रोत्साहन म्हणून वरील परिच्छेद १ मध्ये नमूद केल्यानुसार कमी कमी केलेले अनुदान तद्‌नंतरच्या वर्षात उपलब्ध होण्यास पात्र असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(सुधीर ठाकरे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,मंत्रालय मुंबई
विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व मुख्य कार्यकारी,अधिकारी, जिल्हा परिषद
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा परिक्षा)
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परिक्षा)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा व अनुज्ञेयता)
सर्व जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
उपमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, (सर्व)
जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
प्रादेशिक उप संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, (सर्व)
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (पंचायत) जिल्हा परिषद (सर्व)
उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
गट विकास अधिकारी, पंचायत समिती ( सर्व )
जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, (सर्व)
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग.
मंत्रालयातील सर्व विभाग,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७.

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्ती पाणीपट्टी वसुली व त्यांच्या जिल्हा परिषद व ग्रामपंचायतीमधील वाटपाबाबत

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: ग्रापापु-१००२ / प्रक्र-६३९ /पापु-०७,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२. दिनांक : २२ मे, २००३.**

पहा :- (१) शासन निर्णय पा.पु.व स्व.वि., क्रमांक ग्रापापु-१०९८/ प्र.क्र.२११/पापु-०७, दिनांक १४ डिसेंबर,१९९८
(२) शासन निर्णय पा.पु.व स्व.वि., क्रमांक ग्रापापु-१००३/ प्र.क्र.४/पापु-०७, दिनांक ७ फेब्रुवारी, २००३

**प्रस्तावना:**

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत योजना, एका गावची असेल तर संबंधित ग्रामपंचायत व एका पेक्षा अनेक गावांची (प्रादेशिक) असल्यास, संबंधित जिल्हा परिषद व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी पार पाडीत आहे.

२. प्रादेशिक योजनांचे व्यवस्थापन , देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी सध्याच्या आदेशानुसार जरी संबंधित जिल्हा परिषदेची असली तरी, अशा योजनेसाठी संबंधित ग्राम पंचायत क्षेत्रात पाणीपट्टीद्वारे वसूल झालेल्या रक्कमेपैकी , २० % रक्कम संबंधित ग्रामपंचायत स्वतःकडे ठेवून उर्वरित ८० % रक्कम जिल्हा परिषदेकडे जमा करीत असते. तर, स्वतंत्र गावच्या योजनांचे व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी सध्याच्या आदेशानुसार जरी संबंधित ग्रामपंचायतीची असली तरी ग्रामपंचायतीने, पाणीपट्टीद्वारे वसूल केलेल्या रक्कमेपैकी ८० % रक्कम स्वतःकडे ठेवून उर्वरित २० % रक्कम जिल्हा परिषदेकडे जिल्हा देखभाल दुरुस्ती निधीत जमा करावयाची आहे.

३. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्तीसाठी वरील प्रमाणे व्यवस्था एका विशिष्ट उद्देशाने करण्यात आली होती. स्वतंत्र गावाच्या योजनांसाठी गावाने वसूल केलेल्या पाणीपट्टीपैकी २०% रक्कम जिल्हा परिषदेकडे वर्ग केल्यावर भविष्यात एकादी मोठया स्वरुपाची दुरुस्ती करावयाची झाल्यास, ती या रक्कमेतून जिल्हा परिषद स्तरावर गठीत केलेल्या जिल्हा देखभाल दुरुस्ती निधीतून व्हावी ही अपेक्षा आहे.

D:\backup ५/७०७३ २५/०५/०३\C-DATA\Scheme transfer\Gr Dt.७.५.०३ CR ६३९.doc

जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी.

आवक नंबर 25965/03

तसेच, प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या पाणीपट्टी वसूलीपैकी संबंधित प्रादेशिक योजनेतून सुविधा प्राप्त होणाऱ्या गावाने, गावाअंतर्गत देखभालीची व्यवस्था स्वत:कडे ठेवून घेतलेल्या या २०% निधीतून पहावी अशी अपेक्षा आहे. परंतु, प्रत्यक्षात हे नियोजन होत नाही असे दिसून येते. जिल्हा परिषदा उपलब्ध निधीतून अशा मोठ्या दुरुस्त्या करीत नाहीत. तर, ग्रामपंचायतींना २०% निधी कमी पडतो. बरेचदा याची वसूलीही होत नाही.

४. ग्राम पंचायती अंतर्गत असलेल्या प्रत्येक यशस्वी हातपंपामागे रूपये ५०० व प्रत्येक विद्युतपंपामागे रूपये २५०० अशी रक्कम जिल्हा परिषदेकडे, त्या हातपंपची व विद्युतपंपाची देखभाल व दुरूस्ती जिल्हा परिषदेमार्फत व्हावी यासाठी जमा करावयाची आहे. यातून जिल्हा परिषदे अंतर्गत असलेल्या हातपंप देखभाल व दुरूस्तीच्या फिरत्या पथकाव्दारे ग्राम स्तरावरील हातपंपाच्या व विद्युत पंपाच्या देखभाल दुरूस्तीचा खर्च भागवावा अशी अपेक्षा आहे.

५. ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी केंद्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शक सूचना संपूर्ण राज्यासाठी लागू करण्यात आल्या असून, या सुधारित धोरणानुसार हाती घेण्यात आलेल्या पाणी पुरवठा योजनांवरील व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्तीचा १०० % खर्च संबंधित योजनेच्या लाभार्थ्यांनी करावयाचा आहे. तसेच, ग्रामीण पाणी पुरवठा योजनेअंतर्गत या सुधारित धोरणापूर्वी पूर्ण झालेल्या योजनांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी शासनाकडून देण्यात येणारे अनुदान टप्प्या टप्प्याने कमी करुन पुढील ५ वर्षात ते पूर्णपणे बंद करावयाचा निर्णय संदर्भिय क्रमांक २ येथील दिनांक ७/२/२००३ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

६. वरील वस्तुस्थिती विचारात घेवून, स्वतंत्र व प्रादेशिक योजनांच्या देखभाल व दुरुस्तीच्या सध्याच्या पध्दतीत बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करून शासन ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या व्यवस्थापन देखभाल व दुरुस्ती संदर्भात मागील सूचना रद्द करून पुढील प्रमाणे सूचना देत आहे :- .

(१) स्वतंत्र गावच्या पाणी पुरवठा योजनेच्या दैनंदिन व्यवस्थापन , देखभाल व दुरुस्ती याची संपूर्ण व भविष्यात योजनेचे आयुष्य संपल्यावर तीची पुनर्बांधणी करण्यासाठीच्या भांडवली गुंतवणुकीपैकी किमान १० % खर्चाची जबाबदारी संबंधित ग्रामपंचायतीची असल्याने ती त्या ग्रामपंचायतीने पूर्णत: पार पाडावी. ही जबाबदारी पार पाडीत असताना संबंधित ग्रामपंचायतीच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीस गावच्या / वाडीच्या पाणी पुरवठा योजनेतील मोठ्या दुरुस्त्या जिल्हा परिषदेकडून अथवा इतर सक्षम संस्थांकडून करून घ्यावयाच्या असतील तर, त्यांना तशी मुभा देण्यात येत असून संबंधीत ग्राम पंचायतीच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता

समितीने जिल्हा परिषदेशी अथवा इतर सक्षम संस्थांशी तसा रीतसर करार करावा. या करारात पाणी पुरवठा योजनेतील कोणत्या बाबींची दुरूस्ती जिल्हा परिषदेने अथवा इतर संस्थांनी करावी हे त्यामध्ये स्पष्ट पणे नमूद केलेले असावे. या मोठ्या दुरूस्तीसाठी येणारा खर्च ग्राम पंचायतीच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने पाणी पट्टीव्दारे वसूल करण्यात आलेल्या रकमेतून जिल्हा परिषदेला कामानुसार अदा करून भागवावा. अर्थात, ग्रामपंचायतीला हे काम जिल्हा परिषदे ऐवजी इतर संस्थामार्फत (उदा. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, लघु पाटबंधारे विभाग इ.) अथवा खाजगी संस्थाकडून विहित पध्दतीने खुले कंत्राट देवून अथवा अंतर्गत पध्दतीने (Departmentally) करून घेता येईल. ग्रामपंचायतीच्या, ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने आवश्यकतेनुसार अशा मोठया दुरुस्तीसाठी ग्रामसभेची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. किमान खर्चात पारदर्शक पध्दतीने हे काम करण्यात यावे. त्यासाठी जिल्हा परिषदेकडून अथवा शासनाकडून संबंधित गावास कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळणार नाही. त्यामुळे, **सध्याच्या पध्दतीनुसार ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने योजनेतील पाणी पट्टीच्या रक्कमेपैकी २० % रक्कम जिल्हा परिषदेकडे सरसकट जमा करावयाची आवश्यकता नाही. जिल्हा परिषद व ग्राम पंचायत / इतर संस्था यांच्यातील करारानुसार अशा दुरुस्तीच्या कामांची अंमलबजावणी करावी.**

(२) प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या दैनंदिन व्यवस्थापन , देखभाल व दुरुस्ती यांची संपूर्ण जबाबदारी संबंधित जिल्हा परिषदेची असल्याने, ती त्या जिल्हा परिषदेने पार पाडावी. ही जबाबदारी पार पाडीत असताना, प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेमधील गावातील वितरण व्यवस्थेची देखभाल व दुरूस्तीची जबाबदारी संबंधित ग्रामपंचायतीच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीवर अथवा इतर संस्थेवर सोपवावयाची झाल्यास, ती तशी त्यांच्या सहमतीने रीतसर करार करून सोपविता येईल. त्यासाठी, जिल्हा परिषदेने संबंधित ग्राम पंचायतीशी अथवा इतर संस्थांशी तसा रीतसर करार करावा. या करारात पाणी पुरवठा योजनेतील कोणत्या बाबींची देखभाल व दुरूस्तीची जबाबदारी ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीवर अथवा इतर संस्थांवर सोपविण्यात येत आहे, हे त्यामध्ये स्पष्ट पणे नमूद केलेले असावे व त्या करारानुसार जिल्हा परिषदेस, ग्रामपंचायतीला वेळोवेळी निधी उपलब्ध करुन द्यावा लागेल. संबंधित ग्रामपंचायत ही जबाबदारी योग्य पध्दतीने पार पाडीत नसेल तर, जिल्हा परिषद इतर कोणत्याही संस्थेला खाजगी व्यक्तींना, योजनेत अंतर्भूत सर्व ग्रामपंचायतीच्या शिखर समितीस पारदर्शक पध्दतीने / निविदाव्दारे हे काम व्यवस्थापन करार (Management Contract) करुन सोपवू शकेल. संबंधित गावातील पाणीपट्टीची वसूली करण्याची पध्दतही जिल्हा परिषद ठरवेल व वरीलपैकी कोणत्याही यंत्रणेला त्यांच्या वतीने वसुली करून जिल्हा परिषद खात्यात जमा करण्याचीही जबाबदारी सोपवू शकेल. अशा पध्दतीने नियोजन करुन येणारा खर्च पाणी पट्टीव्दारे वसूल करण्यात आलेल्या

D:\backup ws008 २५०४०३\C DATA\Scheme transfer\GR Dt ६.०६.०३ CR ६३९.doc

रकमेतून जिल्हा परिषदेने भागवावा. त्यासाठी जिल्हा परिषदेस शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळणार नाही. **त्यामुळे, सध्याच्या पध्दतीनुसार प्रदेशिक योजनेतील पाणी पट्टीच्या रककमेपैकी २० % रककम ग्राम पंचायतीकडे सरसकट जमा करावयाची आवश्यकता नाही. ग्राम पंचायत व जिल्हा परिषद / इतर संस्था यांच्यातील करारानुसार अशा दुरुस्तीच्या कामांची अंमलबजावणी करावी.**

(३) ग्राम पंचायती अंतर्गत असलेल्या हातपंपाची व विद्युतपंपाची दुरूस्ती जिल्हा परिषदेकडील देखभाल दुरुस्ती पथकांकडून यासाठीची ठराविक वार्षिक वर्गणी भरुन करून घ्यावी अथवा वार्षिक वर्गणी ऐवजी हे काम संस्थेच्या मागणीनुसार म्हणजे Call Basis वर करुन घेऊन प्रत्येक वेळी कराराप्रमाणे रक्कम अदा करावी किंवा कसे या बाबत संबंधित ग्रामपंचायतीने ग्रामसभेत निर्णय घेऊन ठरवावे. त्या निर्णयानुसार संबंधित ग्राम पंचायतीने जिल्हा परिषदेशी तसा करार करून यानंतर जिल्हा परिषद व ग्रामपंचायत यांच्यातील व्यवहार त्या करारानुसार व्हावा. यापुढे हातपंप व विद्युतपंप दुरूस्तीसाठी वरील प्रमाणे निधी न भरता अथवा करार न करता जिल्हा परिषदेकडील हातपंप देखभाल व दुरूस्ती पथकाच्या सेवा आपोआप उपलब्ध होणार नाहीत.

(४) ग्रामस्तरावरील सर्व योजनांची १००% देखभाल व दुरुस्ती गावाने करावयाची आहे. त्यात ग्रामस्तरावरील शासनाच्या कोणत्याही निधीतून निर्माण करण्यात आलेल्या साध्या विहिरी व विंधण विहिरींचाही समावेश आहे. या योजनांची मालकी संबंधित ग्रामपंचायतीकडे निहित असून त्यांच्या मालकीच्या त्या योजना आहेत. त्यामुळे, ग्रामपंचायतीच्या मालमत्ता नोंदवहित त्याची नोंदणी करुन, त्याप्रमाणे महसूल अभिलेख्यातही त्याची नोंद करून घेण्यात यावी. ही मालमत्ता जिल्हा परिषदेकडे निहीत नाही ही बाब पुन्हा एकदा स्पष्ट करण्यात येत असून त्याप्रमाणे जिल्हा परिषद स्तरावर देखील आवश्यक नोंद घेवून पुढील कार्यवाही व्हावी.

या आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

( सुधीर ठाकरे )
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
विभागिय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
जिल्हाधिकारी (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिष (सर्व)
संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे

विंधण विहीर कार्यक्रमांतर्गत
विंधण विहीरीत सुरक्षा प्लेट
बसविण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन,**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक ग्रापापु १००३ /प्र.क्र.१०१/ पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक : २३ मे, २००३**

**प्रस्तावना :**

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणा-या " **विंधण विहीर** " कार्यक्रम राज्यात दरवर्षी अंदाजे १०,००० ते १२,००० विंधण विहीरी खोदण्यात येतात. आजपर्यंत खोदण्यात आलेल्या विंधण विहीरींपैकी अंदाजे २,३०,००० विंधण विहीरी यशस्वी आहेत. यापैकी अंदाजे २,१८,००० विंधण विहीरींवर हातपंप तर १२,००० विंधण विहीरींवर विद्युतपंप बसविण्यात आले आहेत. या विंधण विहीरींपैकी काही विंधण विहीरी कालांतराने या ना त्या कारणास्तव नादुरुस्त होतात. या नादुरुस्त झालेल्या विंधण विहीरींपैकी ब-याचश्या विंधण विहीरी हया त्यामध्ये दगडगोटे इ. वस्तू टाकल्यामुळे नादुरुस्त झाल्याचे निदर्शनास आले आहे.

२. दगड , गोटे इ. वस्तू टाकल्यामुळे विंधण विहीरी नादुरुस्त होऊ नयेत व शासनाने विंधण विहीरींवर केलेला मोठ्या प्रमाणावरील खर्च निरर्थक होऊ नये म्हणून, ग्रामीण भागात संशोधनात्मक कार्य करणा-या संस्थेने विंधण विहीरींवर बसविण्यासाठी सुरक्षा प्लेट शोधून काढली आहे. सदर सुरक्षा प्लेट (Protection plate) विंधण विहीरीवर बसविण्यास मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करुन व संचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, पुणे यांनी केलेली शिफारस विचारात घेऊन राज्यामध्ये यापुढे विविध कार्यक्रमांतर्गत घेण्यात येणा-या विंधण विहीरींवर **"सुरक्षा प्लेट"** (Protection plate) बसविण्यास शासन मान्यता देत आहे.

२. तसेच, अस्तित्वात असलेल्या यशस्वी विंधण विहीरींवरही टप्प्या टप्प्याने ही सुरक्षा प्लेट (Protection plate) बसविण्यास शासन मान्यता देत आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय

३.. या सुरक्षा प्लेट (Protection plate) चे तांत्रिक विनिर्देश व सदर सुरक्षा प्लेट कशा पध्दतीने विंधण विहीरीत बसवावे या बाबतचे संकल्पचित्र या शासन निर्णयासोबतच्या जोडपत्रांमध्ये देण्यात आले आहे. या संदर्भातील तांत्रिक मार्गदर्शन संचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा यांच्या कार्यालयाकडून घेता येईल.

४. यासाठी होणारा खर्च विविध स्त्रोतांमधून विंधण विहीर कार्यक्रमासाठी मिळणा-या निधीमधून तसेच जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीमधून करण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(सुधीर ठाकरे)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,
सर्व विभागीय आयुक्त,
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ,मुंबई
संचालक,भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,पुणे.
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद.
सर्व प्रादेशिक उपसंचालक,भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) (५ प्रतींसह)
महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) (५ प्रतींसह)
सर्व जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी,
सर्व कार्यकारी अभियंता,ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक,भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
सर्व उप अभियंता (यां) यांत्रिकी उप विभाग, जिल्हा परिषद,
मंत्रालयातील सर्व विभाग
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती,पापु०७

\\Wsvar\Backup wsega 1५०५०\C DATA\Scheme transfer\c r १०१ २००३ doc

# जोडपत्र

(शासन निर्णय पा.पु.व स्व. वि. क्रं.ग्रापापु १००३/ प्रक्र १०१ / पापु-०७ दिनांक २३ मे, २००३ चे जोडपत्र)

## BOREWELL PROTECTION PLATE

### 1. Introduction:-

- It is reported that 5-10% of the borewells are defunct at any time due to various reasons.
- If the repairs / preventive maintenance are not attended timely, these defunct borewells can get permanently damaged.
- **Dropping of external material accidentally or purposefully is one of the main cause of it.**
- If some preventive measures are not taken then the number of permanently damaged borewells will go on increasing day by day.

### 2. How the external material can be dropped into the borewell when there is a handpump or a powerpump installed on it ?

#### 2.1 Borewell installed with a handpump:-

- Handpump is installed on the casing pipe and it is founded in the cement concrete.
- Water chamber is mounted with the help of the nut - bolts.
- These nut bolts get loosened due to the regular impacting action of the handle inside the head.
- These nuts - bolts are misused too,
- Once these nut bolts become loose they are either lost or stolen and it becomes very easy for anybody to slide the water chamber and **drop the external material like stones ,sand, soil into the borewell.**

## 2.2 Borewell installed with a powerpump :-

- In case of the borewell installed with the powerpump riser pipes are rested on the borewell cap with the help of a clamp.
- Generally these borewell caps are fabricated out of M.S. sheet .
- These caps get corroded due to leakage of water and in due course gets deteriorated and it becomes very easy to break it and **drop the external material into the borewells.**


## 3. Borewell Protection Plate

### 3.1 Design details:-

- **This plate is to be inserted into the borewell below the ground level.**
- **Inner dia of the150 mm N.B.dia casing pipe is 154.3 mm ( IS. 1239).**
- **Hence the outer dia. of this plate is designed as 150 mm, allowing an annular clearance of 2.15 mm.**
- **Also this plate have to accommodate the riser pipe through it hence a hole of 45 mm is provided into ,as max. o.d. of 32 mm N.B.dia riser pipe is 42.9 mm.(IS-1239**
- **In order to to design it for the maximum load the plate is fabricated out of a m.s. sheet having thickness of 3 mm.**
- **After inserting into the borewell this plate will rest on the socket of the last but-one pipe. To avoid the chances of getting tilted inside the casing a small bushing is welded on the plate concentric with the hole of 45 mm dia. Thickness of the bushing is kept as 2 mm.**
- **In case of powerpump the inner dia of the plate and bushing are designed according to the outer dia of the riser pipe.**
- **Also in case of the borewells of other dia, outer dia of the plate designed accordingly.**

## Installation of Borewell Protection Plate.

Whenever the new handpump is being installed or it is being repaired this plate should invariably be installed as follows: [illegible] screwing the top most riser pipe to the socket of the last but-one riser pipe this plate should be placed on the socket and through it only the top most riser pipe to be screwed to this socket and then and the only water chamber should be mounted to this pipe as shown below :-



This pipe with the water chamber when lowered with the plate into the borewell will remain in the casing pipe only because the length of the riser pipe is always 3 mtr. and that of the casing pipe is 6 mtr. Borewell protection plate placed into the casing pipe will leave a diametrical clearance of 2 mm only through which even sand particles can not enter below if dropped into the borewell by sliding the water chamber or by breaking the borewell cap.

**Whenever the pump is repaired ,any external material dropped into the borewell will come with the first riser pipe alongwith the plate out of the borewell and borewell remain safe.**

--------------------------------

**सुधारित ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम- लोकसहभागाची संकल्पना व कार्यक्रम राबविण्यासाठी मार्गदर्शक सूचना-जलस्वराज्य प्रकल्पासाठी सुधारित सूचना**

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्र.ग्रापापु १००३/प्र.क्र.१६६/पापु.०७
**मंत्रालय,मुंबई ४०० ०३२ दिनांक २२ ऑगस्ट,२००३.**

वाचा : १) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु १००१/प्र.क्र.१९०/ पापु.०७, दिनांक ३ सप्टेंबर,२००१.
२) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.ग्रापापु-१००२/प्रक्र-५३२/ पापु-०७, दिनांक २३.३.२००२.

प्रस्तावना-

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम राबविण्यासाठी केंद्र शासनाचे सुधारित धोरण शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु १०९९/प्र.क्र.३२८/ पापु.०७ दिनांक २७.७.२००० अन्वये संपूर्ण राज्यामध्ये लागू करण्यात आल्यानंतर या सुधारित धोरणातील लोकसहभागाचे तत्व स्पष्ट करुन त्याअनुषगाने या धोरणाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी संदर्भिय दि.३.९.२००१ च्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

२. या सुधारित मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यामध्ये ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाची अंमलबजावणी करीत असताना गेल्या दिड वर्षात प्रत्यक्ष अंमलबजावणीमध्ये आलेल्या अडचणी, मागणी आधारित लोकसहभागातून पाणी पुरवठ्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी ग्रामस्थांकडून आलेल्या सूचना व पूर्वीच्या अंमलबजावणी यंत्रणा व नव्या धोरणानुसार ज्यांची भूमिका व जबाबदारी आता मार्गदर्शक सहाय्यकारी यंत्रणा अशा स्वरुपाची आहे अशा जिल्हा परिषदा, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा या शासकीय अथवा शासन नियंत्रित यंत्रणांकडून प्राप्त माहितीच्या आधारे वरील संदर्भात नमूद शासन आदेशातील काही सूचना व मार्गदर्शक तत्वांमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. राज्यात नवीन मागणी आधारित लोकसहभागाच्या तत्वावर सुरु असलेल्या सर्व कार्यक्रमांसाठी या सूचनांची दुरुस्ती आवश्यक आहे. त्यापैकी जागतिक बँकेच्या सहाय्याने राज्यात जलस्वराज्य प्रकल्प राबविण्यासाठी जागतिक बँकेने केलेल्या आणखी काही सूचना विचारात घेऊन संदर्भिय दि.३.९.२००१ च्या शासन निर्णयामधील मार्गदर्शक सूचनांमध्ये काही दुरुस्त्या करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

शासन निर्णय-

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करुन राज्यामध्ये जागतिक बँक सहाय्यीत "जलस्वराज्य" प्रकल्प राबविण्यासाठी संदर्भिय दि.३.९.२००१ च्या शासन निर्णयात पुढीलप्रमाणे दुरुस्ती करण्यास शासन मंजूरी देत आहे :-

रोप्रे/एक्स-744(2,000-8-03)-1